Title of Programme: **वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तक भेट कार्यक्रम**
Name of Organizing Department: **मराठी विभाग**
Name of the Coordinator of the Programme : **डॉ. संजय शिंदे**
Date of the Programme : **१४ ऑक्टोबर २०२१**
Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर**
Target Group: **प्रथम वर्ष कला व वाणिज्य**
Number of Participants: **१४०**
Name of Resource Person: **संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील**
Total Expenditure for the Programme: --- ४२००/-
Source of Funding: ----- **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर**

**Report: वाचन प्रेरणा दिनानिमित्त पुस्तक वाटप कार्यक्रम अहवाल**

दि. १४ ऑक्टोबर २०२१ रोजी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस (१५ ऑक्टो.) वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना पुस्तक भेट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा.योगेश वाळुंज, प्रा. साईनाथ पाचारणे उपस्थित होते. या कार्यक्रमात सुमारे १४० विद्यार्थ्यांना (सवलतीमध्ये) पुस्तक वाटप करण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड देवेंद्र बुट्टे पाटील यांनीमार्गदर्शन केले. ते म्हणाले, की वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धता माणसाला जगण्यास पात्र बनवत असून विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचनसंस्कृती जोपासावी. ते पुढे म्हणाले की, विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याला चौफेर वाचन हे श्वासोच्छासाइतकेच आवश्यक आहे. वाचनातून ज्ञानतृष्णा व ज्ञानसंग्रह करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासावी. मराठी विभाग विद्यार्थ्यांची वाचनाची आवड जोपासण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला करोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय सुरू होणार असल्याने वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

संस्था उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर यांनी वाचनामुळे माणसाची विचार करण्याची क्षमता वाढून जाणिवा सशक्त होत असल्याने विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या सहवासात रमण्याचे आवाहन केले

प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी सजक अभिरुची वृद्धीसाठी वाचन आवश्यक असल्याचे म्हटले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन डॉ बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा साईनाथ पाचारणे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.




पुस्तक प्राप्त विद्यार्थ्यांसह संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील




पुस्तक प्राप्त विद्यार्थ्यांसह संस्थाध्यक्षॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

लोकमत

अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

# वाचनातून येणारी सर्वांगिण समृद्धता जगायला शिकवते

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धता माणसाला जगण्यास पात्र बनवते. विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचन संस्कृती जोपासावी असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवसानिमित्त वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात अॅड. बुट्टे पाटील बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. साईनाथ पाचारणे उपस्थित होते.



मयुरी साकोरे हिचा गौरव करताना अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील

अॅड. बुट्टे पाटील म्हणाले, विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याला चौफेर वाचन आवश्यक आहे. वाचनातून ज्ञान तृष्णा व ज्ञान संग्रह करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासावी. मराठी विभाग विद्यार्थ्यांची वाचनाची आवड जोपासण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय सुरू होणार असल्याने वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

## काव्यवाचन स्पर्धेत मयूरी साकोरे प्रथम

१ वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने व्याख्यान, काव्यवाचन स्पर्धा तसेच विविध ऑनलाईन उपक्रमात सहभाग घेतलेल्या सुमारे १२५ विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले. कोपरगाव महाविद्यालयातील डॉ. कैलास महाले यांचे ' महाविद्यालयीन तरुणाई व वाचन संस्कृती ' या विषयावर ऑनलाईन वेबिनार संपन्न झाले.

२ काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक मयुरी साकोरे, द्वितीय संस्कृती राळे व तृतीय क्रमांक आलिशा रौंधळ यांचा आला. पुस्तक, प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. परीक्षक म्हणून प्रा. डी. एम. मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगीरे यांनी काम पाहिले.

Hello Pune Gramin
Page No. 8 Oct 17, 2021
Powered by: erelego.com

पुढारी

# समृद्ध जीवनासाठी वाचनसंस्कृती जोपासावी

अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांचे आवाहन; राजगुरु महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन



काव्यवाचन स्पर्धेतील प्रथम क्रमांक मिळविलेल्या मयूरी साकोरे हिचा गौरव करताना संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील.

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धता माणसाला जगण्यास पात्र बनवो. विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचनसंस्कृती जोपासावी, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवसानिमित्त वाचन प्रेरणा दिन गुरुवारी (दि. १४) साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे आदी उपस्थित होते.

वाचन प्रेरणा दिनाच्यानिमित्ताने मराठी विभागाच्या वतीने व्याख्यान, काव्यवाचन स्पर्धा, तसेच विविध ऑनलाइन उपक्रमात सहभागी झालेल्या १२५ विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले. कोपरगाव महाविद्यालयातील डॉ. कैलास महाले यांचे ''महाविद्यालयीन तरुणाई व वाचनसंस्कृती'' या विषयावर ऑनलाइन वेबिनार झाले. काव्यवाचन स्पर्धेत मयूरी साकोरे, संस्कृती राळे, आलिशा रौंधळ यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक मिळविले. परीक्षक म्हणून प्रा. डी. एम. मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगिरे यांनी काम पाहिले. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. साईनाथ पाचारणे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Oct 17, 2021 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. १७ ऑक्टोबर २०२१

# वाचनाने जगणे समृद्ध होते : अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील

राजगुरुनगर (दै. संध्या) :



वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धता माणसाला जगण्यास पात्र बनवत असून विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचन संस्कृती जोपासावी असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवसानिमित्त वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा.योगेश वाळुंज, प्रा. साईनाथ पाचारणे उपस्थित होते.

अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी पुढे सांगितले की, विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याला चौफेर वाचन हे श्वासोच्छासाइतकेच आवश्यक आहे. वाचनातून ज्ञानतृष्णा व ज्ञानसंग्रह करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासावी. मराठी विभाग विद्यार्थ्यांची वाचनाची आवड जोपासण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय सुरू होणार असल्याने वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी वाचनामुळे माणसाची विचार करण्याची क्षमता वाढून जाणिवा सशक्त होत असल्याने विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या सहवासात रमण्याचे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी सजक अभिरुची वृद्धीसाठी वाचन आवश्यक असल्याचे म्हटले.

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने व्याख्यान, काव्यवाचन स्पर्धा तसेच विविध ऑनलाईन उपक्रमात सहभाग घेतलेल्या सुमारे १२५ विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले. कोपरगाव येथील महाविद्यालयातील डॉ. कैलास म हाले यांचे 'महाविद्यालयीन तरुणाई व वाचनसंस्कृती' या विषयावर ऑनलाईन वेबिनार संपन्न झाले. काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक मयुरी साकोरे, द्वितीय क्रमांक संस्कृती राळे व तृतीय क्रमांक आलिशा रींधळ या विद्यार्थीनींचा आला. पुस्तक, प्रशस्तिपत्रक देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. परीक्षक म्हणून प्रा.डी.एम.मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगिरे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा. साईनाथ पाचारणे यांनी मानले.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी

# वाचनाने जगणे समृद्ध होते : अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील

राजगुरुनगर
गांवकरी प्रतिनिधी



वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धता माणसाला जगण्यास पात्र बनवत असून विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचनसंस्कृती जोपासावी असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्म दिवसानिमित्त वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा.योगेश वाळुंज, प्रा. साईनाथ पाचारणे उपस्थित होते. अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी पुढे सांगितले की, विद्यार्थी कोणत्याही शाखेचा असला तरी त्याला चौफेर वाचन हे श्वासोच्छासाइतकेच आवश्यक आहे. वाचनातून ज्ञानतृष्णा व ज्ञानसंग्रह करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासावी. मराठी विभाग विद्यार्थ्यांची वाचनाची आवड जोपासण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालय सुरू होणार असल्याने वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी वाचनामुळे माणसाची विचार करण्याची क्षमता वाढून जाणिवा सशक्त होत असल्याने विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या सहवासात रमण्याचे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी यांनी सजक अभिरुची वृद्धीसाठी वाचन आवश्यक असल्याचे म्हटले. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने व्याख्यान, काव्यवाचन स्पर्धा तसेच विविध ऑनलाईन उपक्रमात सहभाग घेतलेल्या सुमारे १२५ विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले. कोपरगाव येथील महाविद्यालयातील डॉ. कैलास महाले यांचे 'म हाविद्यालयीन तरुणाई व वाचनसंस्कृती' या विषयावर ऑनलाईन वेबिनार संपन्न झाले. काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक मयुरी साकोरे, द्वितीय क्रमांक संस्कृती राळे व तृतीय क्रमांक आलिशा रींधळ या विद्यार्थीनींचा आला. पुस्तक, प्रशस्तिपत्रक देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. परीक्षक म्हणून प्रा.डी.एम.मारकड व प्रा. सोमनाथ ठोंगिरे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा. साईनाथ पाचारणे यांनी मानले.

वर्ष : १४० Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57
केसरी
राष्ट्रीय ठेवा

# विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचनसंस्कृती जोपासावी : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** वाचनातून आनंद व त्यातून येणारी सर्वांगीण समृद्धता माणसाला जगण्यास पात्र बनवत असून विद्यार्थ्यांनी समृद्ध जीवनासाठी वाचनसंस्कृती जोपासावी, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवसानिमित्त वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करताना आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. किशोर लांडेपाटील, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा. डी. एम. मारकड, प्रा.योगेश वाळुंज, प्रा. साईनाथ पाचारणे उपस्थित होते. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने व्याख्यान, काव्यवाचन स्पर्धा तसेच विविध ऑनलाईन उपक्रमात सहभाग घेतलेल्या सुमारे १२५ विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा. साईनाथ पाचारणे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
**मराठी विभाग प्रमुख**
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.